# पंचायत समितीचे माजी सदस्य राजेंद्र चौधरी यांचे निधन

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)**– पंचायत समितीचे माजी सदस्य, पूर्वाश्रमीचे स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे समर्थक, नीलेश लंके प्रतिष्ठानचे राजेंद्र भिकाजी चौधरी (वय ५३) यांचे सोमवारी (दि. २९) सायंकाळी सात वाजता पुण्याच्या खासगी रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.



सन २००७ मध्ये चौधरी शिवसेनेच्या तिकीटावर पंचायत समिती सदस्य म्हणून विजयी झाले. त्यांनी आपल्या पदाच्या माध्यमातून अनेक विकास कामे मार्गी लावली. सर्वसामान्यांचे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. अनेक शासकीय समित्यांवर त्यांनी काम केले. सध्या खंडोबा देवस्थानचे विश्वस्त म्हणून ते काम पाहत होते. मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास चौधरी यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस मोठा जनसमुदाय उपस्थित होता. खा. नीलेश लंके, आ. काशिनाथ दाते, बाळासाहेब नाहाटा, विकास रोहोकले, सुदाम पवार, सुवर्णा धाडगे, अशोक घुले, प्रकाश गाजरे, मोहन रोकडे, बापूसाहेब शिर्के, ठकाराम लंके, ॲड. राहूल झावरे, कारभारी पोटघन, बाळासाहेब दिघे, उपसभापती किसन सुपेकर, शिवाजी खिलारी, मारूती रेपाळे, डॉ. दीपक आहेर, शंकर नगरे, शिवाजी होळकर, अजय लामखडे, शिवाजी बेलकर आदी उपस्थित होते.

# समर्थ समाज संस्थेचा सदस्य असल्याची बनावट कागदपत्रे बनविली

## संगमनेर तालुक्यातील ओझर खुर्द येथील दादा शेपाळ विरूद्ध गुन्हा दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)**– ठाणे जिल्ह्यातील डोंबीवली येथील समर्थ समाज संस्थेवर ताबा मिळविण्यासाठी व स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी बनावट पावती बनवून, त्यावर खोटी सही करून, संस्थेच्या प्रणालीमध्ये फेरफार केल्याच्या आरोपावरुन संगमनेर तालुक्यातील ओझर खुर्द येथील दादा काशिनाथ शेपाळ यांच्या विरूद्ध ठाणे पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

डोंबीवली येथे सन १९६० मध्ये स्व. सखाराम हैबती जोंधळे यांनी समर्थ समाज संस्था स्थापन केली आहे. या संस्थेंतर्गत अनेक शैक्षणिक संस्थांचा कारभार चालतो. या संस्थेच्या अध्यक्षस्थानी सागर जोंधळे, उपाध्यक्ष म्हणून श्रीमती वैशाली जोंधळे तर सचिव म्हणून देवेंद्र जोंधळे, विश्वस्त म्हणून श्रीमती भागीरथीबाई जोंधळे, तात्याबा शेपाळ, नरेंद्र चौधरी व आण्णासाहेब चौधरी हे कामकाज पाहतात. परंतू ओझरखुर्द येथील रहिवाशी दादा काशिनाथ शेपाळ यांनी ही संस्था हडपण्यासाठी ठाणे धर्मदाय उपआयुक्त व मुंबई येथील सहधर्मदाय आयुक्तालय येथे बनावट कागदपत्रे करून याचिका दाखल केली.

या प्रकरणी संस्थेचे सहसचिव तात्याबा मुरलीधर शेपाळ यांनी ठाणे शहर पोलिसात दाखल केलेल्या फिर्यादीत म्हंटले आहे की, दादा शेपाळ यांनी सदरची याचिका दाखल करण्यासाठी वापरलेली समर्थ संस्थेची सदस्यत्व शुल्क भरणा केल्याची एक्कावन्न हजार रुपयांची पावती बनावट असल्याचे निदर्शनास आले आहे. त्या पावतीवर मी सही केलेली नसून ती सही बनावट आहे. पावती मधील रक्कम एक्कावन्न हजार रुपये ही कोणत्याही धनादेशाने अथवा डीडीने संस्थेच्या बँक खात्यावर जमा झालेली नाही. सभासद अथवा सदस्य होण्यासाठी दादा शेपाळ यांनी संस्थेकडे कोणत्याही प्रकारे लेखी नमुन्यानुसार अर्ज केलेला नाही. संस्थेच्या बैठकीत त्यांना सदस्यत्व देण्याचा कोणताही ठराव मंजूर झालेला नाही.

दि.११ मार्च २०२५ रोजीच्या पुर्वी दादा काशिनाथ शेपाळ यांनी स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी संस्थेवर ताबा मिळविण्यासाठी समर्थ समाज संस्थेचा सदस्य असल्याचे भासवून ठाणे धर्मदाय उपायुक्त कार्यालय व वरळी येथील सहधर्मदाय आयुक्त कार्यालय या कार्यालयात याचिका दाखल करताना समर्थ संस्थेच्या सदस्यत्व शुल्काचा भरणा केल्याची एक्कावन्न हजार रुपयाची बनावट पावती बनवून त्यावर माझी खोटी सही करून संस्थेच्या प्रणालीमध्ये फेरफार केला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

याप्रकरणी दादा काशिनाथ शेपाळ यांच्याविरूद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३६(४), ३३८ व ३४०(२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास विष्णूनगर पोलीस निरीक्षक संजय महिपात्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# ‘नाक दाबलं की तोंड उघडतं’

## सरकारच्या निर्णयाचे अण्णा हजारेंकडून समर्थन

**पारनेर (तालुका प्रतिनिधी)** – पहलगाम हल्ल्यानंतर सरकारनं सिंधू नदीचं पाकिस्तानात जाणार पाणी थांबण्याचा निर्णय घेतला, त्या निर्णयाचे जेष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांनी समर्थन केले आहे. ‘नाक दाबलं की तोंड उघडतं’ अशी एक जुनी म्हण आहे. त्यामुळे सिंधू नदीचं पाणी थांबवणं ही कृती योग्य आहे, असे त्यांनी म्हटले आहे.



अण्णा हजारे म्हणाले, पर्यटक हे पर्यटक असतात, ते कोणत्या देशाचे किंवा धर्माचे नसतात. काही देशविरोधी शक्तींना भारतातील शांतता, एकोप्याचे वातावरण खपवत नाही, म्हणूनच ते अशा खोडसाळ आणि क्रूर कृत्यांना प्रवृत्त होतात. अशा घटना अत्यंत दुर्दैवी आहेत. मात्र, आपण घाबरून न जाता एकत्र येऊन अशा हल्ल्यांचा विरोध करायला हवा. यावेळी अण्णा हजारे यांनी १९६५ साली भारत-पाकिस्तान युद्धाच्या आठवणीही सांगितल्या आहेत. मी काश्मीरमध्ये होतो. आमच्या सैन्य तुकडीवर पाकिस्तानी लढवय्या विमानांनी हल्ला केला होता. त्यात अनेक जवान शहीद झाले होते आणि माझ्याही डोक्याला गंभीर जखम झाली होती. आजही देशविरोधी शक्तींविरोधात लढणारे आपले सैनिक सज्ज आहेत आणि त्यांच्यावर संपूर्ण देशवासियांचा विश्वास आहे, असेही अण्णा हजारे म्हणाले.

# १ मे पासून पाकिस्तानसोबतचे सर्व व्यावसायिक करार संपवण्याची घोषणा

**नवी दिल्ली**– भारतातील व्यापाऱ्यांची सर्वात मोठी संघटना असलेल्या कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स ने १ मे पासून पाकिस्तानसोबत कोणताही व्यापार करार न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर आतापर्यंत केलेले सर्व करार रद्द केले जातील. भुवनेश्वर येथे झालेल्या कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या अखिल भारतीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

कॉन्फिडन्स ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सचे देशभरात सुमारे ९ कोटी व्यापारी सदस्य आहेत. समितीचे अध्यक्ष बी.सी. भारतीय म्हणाले की, भुवनेश्वरच्या बैठकीत सर्व राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते, ज्यामध्ये पाकिस्तानसोबतचे सर्व व्यावसायिक करार संपुष्टात आणण्याचा निर्णय घेण्यात आला. ते म्हणाले की, पाकिस्तानातील व्यापारी कॅटद्वारे सुमारे १ लाख कोटी रुपयांचा व्यवसाय करतात.

**९ कोटी व्यापाऱ्यांचा पाठिंबा**

सीएआयटीचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.सी. भारतीय यांनी माहिती दिली की या निर्णयाला देशभरातील सुमारे ९ कोटी व्यापाऱ्यांचा पाठिंबा आहे. ते म्हणाले की, भारतीय व्यापारी दरवर्षी पाकिस्तानसोबत सुमारे १ लाख कोटी रुपयांचा व्यापार करतात, जो आता पूर्णपणे थांबवला जाईल.

**या वस्तूंचा व्यवसाय पाकिस्तानमधून केला जातो**

भारतीय व्यापारी पाकिस्तानसोबत साखर, सिमेंट, लोखंड, वाहनांचे सुटे भाग, इलेक्ट्रिकल वस्तूंचा व्यवसाय करतात, परंतु आता त्यांनी १ मे पासून हा व्यवसाय न करण्याचा निर्णय घेतला आहे, या व्यापाऱ्यांनी असेही म्हटले आहे की ते लवकरच पंतप्रधान कार्यालय, अर्थमंत्री कार्यालय, वाणिज्य मंत्रालयाला याबद्दल माहिती देतील. ते म्हणाले की, एकीकडे सरकारने पाणीपुरवठा बंद केला आहे, तर दुसरीकडे व्यापारीही स्वत:ला देशाचे सैनिक मानतात, ज्या अंतर्गत त्यांनी पाकिस्तानशी व्यापारी संबंध तोडण्याचा निर्णय घेतला आहे, या निर्णयामुळे पाकिस्तान आर्थिकदृष्ट्याही कमकुवत होईल.

**सुका मेवा पाकिस्तानातून येतो**

संघटनेचे म्हणणे आहे की भारतीय व्यापारी तिथून सुक्या मेव्याची मागणी करतात, परंतु त्या भागात व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्यांना सांगितले की ते सर्व करार रद्द करतील. २०१९ मध्ये पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील व्यापारी संबंधांमध्ये कटुता निर्माण झाली होती हे लक्षात घेण्यासारखे आहे. परिणामी, दोन्ही देशांमधील व्यापारात मोठी घट झाली आहे, २०१८ मध्ये सुमारे ३ अब्ज डॉलर्सचा वार्षिक व्यापार होता तो २०२४ मध्ये १.२ अब्ज डॉलर्सवर पोहोचला आहे.

# महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथयात्रा आज अहिल्यानगर जिल्ह्यात

## माजी आ. लहू कानडे यांच्यावतीने राहुरी फॅक्टरी येथे स्वागत

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) पक्षाच्यावतीने राज्याच्या ६५ व्या स्थापना दिनानिमित्त दि. १ ते ४ मे या कालावधीत महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथयात्रा काढण्यात आली आहे. उत्तर महाराष्ट्र विभागाच्या रथ यात्रेचे प्रस्थान दि.२७ एप्रिल रोजी जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर येथून करण्यात आले आहे.

ही रथयात्रा धुळे, नंदुरबार, नाशिक येथील ऐतिहासिक व पवित्र स्थळांना भेटी देऊन अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी येथे आज बुधवार दि. ३० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृहाजवळ येणार आहे. त्यानंतर श्री साईबाबांचे दर्शन घेऊन नियोजित कार्यक्रम आटोपून ही रथयात्रा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जन्मस्थान देवळाली प्रवरा येथून पुढे मार्गस्थ होणार आहे. राहुरी फॅक्टरी येथील महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसरामध्ये श्रीरामपूर चे माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष लहू कानडे व उत्तर नगर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते या यात्रेचे जोरदार स्वागत करणार आहेत.

शिर्डी ते राहुरी फॅक्टरी मार्गावरील रस्त्याच्या दुतर्फा रथयात्रेचे स्वागत करणारे फलक तसेच पक्षाचे झेंडे लावण्यात आले आहेत. देवळाली प्रवरा येथे अजित कदम हे या रथयात्रेत सहभागी झालेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची भोजन व्यवस्था करणार आहेत. राहुरी फॅक्टरी येथून दुपारी २ वाजता ही रथयात्रा महात्मा फुले कृषी विद्यापीठ मार्गे नगर कडे रवाना होणार असून नगर, पारनेर, पुणे मार्गे मुंबईकडे रवाना होणार आहे. या रथयात्रेच्या स्वागतासाठी श्रीरामपूरचे मा.आ. लहू कानडे यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अविनाश आदिक, माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक, अरुण पाटील नाईक, अशोक कानडे, अजित कदम, अमृत धुमाळ, कैलास बोर्डे, राष्ट्रवादीचे श्रीरामपूर शहराध्यक्ष अभिजित लिप्टे पाटील, कालर्स साठे, सतीश बोर्डे, रमेश आव्हाड, सचिन जगताप, राजेंद्र औताडे, मदन हाडके, राजेंद्र कोकणे, दिपक निंबाळकर, अक्षय नाईक, नानासाहेब रेवाळे, युनूस शेख, शब्बीर पटेल, चंद्रसेन लांडे, डॉ.राजाराम राशिनकर, अजय खिलारी, जुगल किशोर गोसावी, अनिल बिडे, वेणूनाथ कोतकर, गणेश कोतकर, दिपक कदम, मल्लू शिंदे, भैय्या शाह, रुबिना पठाण, निलेश भालेराव, सागर मुठे, शिवाजी पवार, ॲड. संदीप चोरगे, आशिष शिंदे, सम्राट माळवदे आदी मान्यवर परिश्रम घेत आहेत.

# म्हस्के, भालेराव जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)**– क्रीडा क्षेत्रात मानाच्या समजल्या जाणाऱ्या जिल्हा क्रीडा पुरस्कारांची घोषणा झाली आहे. गेल्या पाच वर्षांपासून या पुरस्कारांची क्रीडापटू व मार्गदर्शकांना प्रतीक्षा होती. यंदा ही कोंडी फुटली आहे. प्रा. डॉ. विजय म्हस्के, दिनेश भालेराव, शंकर गदई यांच्यासह खेळाडू या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा क्रीडा पुरस्कार निवड समितीने जिल्हा क्रीडा पुरस्कारांची घोषणा केली. यात २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, व २०२३-२४ या पाच वर्षांसाठी गुणवंत खेळाडू (पुरुष व महिला) व गुणवंत क्रीडा मार्गदर्शक तसेच सन २०१९-२०साठी गुणवंत क्रीडा कार्यकर्ता/संघटक पुरस्कार्थीची निवड केलीआहे. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, रोख १० हजार रूपये असे पुरस्कारांचे स्वरूप आहे. २०१९-२०चे जिल्हा क्रीडा पुरस्काराचे मानकरी : (एकूण सहा) गुणवंत क्रीडा कार्यकर्ता / संघटक पुरस्कार- दिनेश लक्ष्मण भालेराव, जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत क्रीडा कार्यकर्ता/संघटक गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार- डेव्हिड सुरेश मकासरे, (पावरलिफ्टिंग). गुणवंत खेळाडू पुरस्कार : (पुरुष प्रवर्ग) - सोमनाथ सपकाळ (बेसबॉल): जिल्हा महिला प्रवर्ग : अपूर्वा गोरे (सायकलिंग). दिव्यांग प्रवर्ग : सुहास मोरे (मैदानी). गुणवंत खेळाडू पुरस्कार- फिजा सय्यद (सॉफ्टबॉल).२०२०-२१ चे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार : प्रा. डॉ. विजय म्हस्के (व्हॉलीबॉल), गुणवंत खेळाडू पुरस्कार- करण गहाणडुले. महिला प्रवर्ग- वैष्णवी गोडळकर (तलवारबाजी). २०२१-२२ चे क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार- प्रा. विजय देशमुख (वेटलिफ्टिंग), गुणवंत खेळाडू पुरस्कार- श्रीनिवास कराळे (मैदानी): गुणवंत खेळाडू पुरस्कार- विश्वेशा मिस्कीन. २०२२-२३ चे गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार- श्रीरामसेतू आवारी (मैदानी). गुणवंत खेळाडू पुरस्कार- ओम करांडे (सायकलिंग). गुणवंत खेळाडू पुरस्कार- कोमल वाकळे (वेटलिफ्टिंग). २०२३-२४ च्या जिल्हा मार्गदर्शक पुरस्कार- लक्ष्मण उदमले (वुशू). गुणवंत खेळाडू पुरस्कार- ओंकार सुरग (तलवारबाजी). खेळाडू पुरस्कार- योगिता खेडकर (वेटलिफ्टिंग). गुणवंत खेळाडू पुरस्कार : (विशेष बाब)- शंकर गदाई (कबड्डी).

पान १ वरुन

## हल्ल्याचे लक्ष्य, वेळ ठरवण्याचे लष्कराला पूर्ण स्वातंत्र्य

सांगितले की, हल्ल्याचा मास्टरमाइंड पाकिस्तानचा माजी एसएसजी कमांडर हाशिम मुसा आहे. मुसा सध्या लष्कर-ए-तैयबामध्ये काम करत आहे.

लष्करानेच त्याला जम्मू आणि काश्मीरमध्ये पाठवले होते जेणेकरून तो सुरक्षा दलांवर आणि बिगर-काश्मिरींवर हल्ले करू शकेल. मुसाने ऑक्टोबर २०२४ मध्ये गंदरबलमधील गगनगीर येथे हल्ला केला. यामध्ये अनेक कामगार आणि एका स्थानिक डॉक्टरला आपला जीव गमवावा लागला.

हल्ल्याचा तपास करणारी एनआयए सतत घटनास्थळी रिक्रिएशन करत आहे. ही संस्था दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या स्थानिक नागरिकांचा शोध घेत आहे. २२ एप्रिल रोजी पहलगामच्या बैसरन खोऱ्यात झालेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता.

पंतप्रधानांच्या निवासस्थानी दीड तास चाललेली उच्चस्तरीय बैठक संपली आहे. या बैठकीत पंतप्रधान मोदींसोबत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, संरक्षण प्रमुख अनिल चौहान, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल आणि तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख उपस्थित होते.

## भारत पाकिस्तानवर मोठी कारवाई करण्याच्या तयारीत!

**बैठकीत शहा, राजनाथ राहणार उपस्थित**

आज सकाळी ११ वाजता सीसीएसची ही महत्त्वाची बैठक होणार आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शहा, अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे सीसीएसचे इतर सदस्य आहेत. ते या बैठकीला उपस्थित राहतील, असे समजते. या बैठकीत पहलगाम हल्ल्यानंतर देशाच्या सुरक्षा तयारीचा आढावा घेतला जाईल. अलिकडच्या काळात झालेले हल्ले, नियंत्रण रेषेवरील परिस्थिती, सुरक्षा दलांची रणनीती आणि प्रत्युत्तर रणनीती यावर या बैठकीत सखोल चर्चा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, सीसीएस बैठकीनंतर आर्थिक बाबींवरील कॅबिनेट समितीची बैठकीचेही नियोजन असल्याचे वृत्त आहे.

**दुसऱ्या बैठकीत काय निर्णय होणार?**

२३ एप्रिल रोजी झालेल्या सीसीएसच्या पहिल्या बैठकीत भारताने पाकिस्तानबाबत अनेक कठोर निर्णय घेतले होते. त्यात पाकिस्तानी नागरिकांचा व्हिसा तातडीने रद्द, सिंधू पाणी कराराला स्थगिती, अटारी सीमा बंद करणे असे काही महत्त्वाचे निर्णय होते. त्यावर प्रत्युत्तर म्हणून पाकिस्ताननेही काही निर्बंध घातले आणि सिंधू पाणी कराराला स्थगिती देणे म्हणजे युद्धाची कृती असल्याचे संबोधले. त्यामुळे उद्याच्या बैठकीत काय निर्णय घेतला जातो हे महत्त्वाचे ठरणार आहे.

**सीमेवर सलग पाचव्या रात्री गोळीबार;**

**भारताचे जोरदार प्रत्युत्तर**

दरम्यान, पाकिस्तानी सैन्याने सलग पाचव्या रात्री जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेवर (डेउ) शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. अखनूर सेक्टरजवळ झालेल्या गोळीबाराला भारतीय सैन्यानेही जोरदार प्रत्युत्तर दिले, अशी माहिती मंगळवारी एका अधिकाऱ्याने दिली आहे.

## जिल्ह्यातील सहा अंमलदारांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह

प्राप्त करणे हा एक मोठा मान आहे. पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांची मेहनत, निष्ठा आणि कर्तव्यपरायणतेला हा सन्मान मिळाल्यामुळे ते पुढील कार्यासाठी प्रेरित होतील. पोलीस अंमलदारांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## एक रुपयात पीक विमा योजना गुंडाळली

घोटाळा उघड केला होता. या घोटाळ्याच्या चौकशीत शेतकरी नसलेल्या व्यक्तींच्या नावे पीक विमा उतरविण्यात आल्याचे आढळून आले होते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने १ रुपयात पीक विमा योजना बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत सर्वसमावेशक पीक विमा योजनेत बदल करुन, पीक कापणी प्रयोगांवर आधारित सुधारित पीक विमा योजना राबविण्यास आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शेतकऱ्यांकडून शेतकरी हिस्सा, खरीप पिकासाठी २ टक्के, रब्बी पिकासाठी १.५ टक्के आणि नगदी पिकांना ५ टक्के याप्रमाणे ठेवण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात सध्या २६ जून २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार पंतप्रधान पीक विमा योजना खरीप हंगाम २०२३ ते रब्बी हंगाम २०२५-२६ हंगामासाठी लागू करण्यात आली आहे. मात्र, आता सुधारित पीक विमा योजना राबविताना नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ही निविदा प्रक्रिया राबविल्यानंतर प्राप्त होणारी विमा हप्ता दरांच्या तुलनात्मक माहितीच्या आधारे तसेच राज्यस्तरीय पीक विमा समन्वय समितीच्या मान्यतेने योजना लागू होईल. याबरोबरच पंतप्रधान पीक विमा योजनेअंतर्गत राबविण्यात येणारी पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना आहे त्या स्वरूपात चालू ठेवण्यासाठी मंत्रिमंडळाने काल मान्यता दिली.

**पुढील पाच वर्षात २५ हजार कोटींची गुंतवणूक**

दरम्यान, शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी नवीन योजना राबविण्यासाठी पुढील पाच वर्षात दरवर्षी पाच हजार कोटी याप्रमाणे एकूण २५ हजार कोटींची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने काल मान्यता दिली.

**पीक विमा योजनेतील सहभागी शेतकरी**

२०२१-२२..... ९६ लाख
२०२२-२३..... १ कोटी ४ लाख
२०२३-२४..... २ कोटी ४२ लाख

## वाहन खरेदीत २०३० पर्यंत सवलत

ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येक २५ किमी अंतरावर चार्जिंग सुविधा उभारली जाणार आहे. यामुळे राज्यात विद्युत वाहनांचा वापर आणि विक्रीमध्ये मोठी वाढ अपेक्षित आहे.

या धोरणांतर्गत राज्यात विक्री आणि नोंदणी झालेल्या सर्व विद्युत वाहनांना मोटार वाहन करातून तसेच नोंदणी प्रमाणपत्राच्या किंवा नुतनीकरण शुल्कातून माफी देण्यात आली आहे. तसेच विद्युत वाहन खरेदीत २०३० पर्यंत सवलत दिली जाणार आहे. विद्युत दुचाकी, तीन चाकी, चारचाकी, राज्य परिवहन उपक्रमाच्या बसेस तसेच खासगी बसेसाठी मूळ किंमतीच्या १० टक्के सवलत दिली जाणार आहे. तर इलेक्ट्रिक तीनचाकी मालवाहू वाहने, चारचाकी (परिवहन), चारचाकी हलके मालवाहू वाहन, चारचाकी मालवाहू वाहने तसेच शेतीसाठीचे इलेट्रिक ट्रॅक्टर आणि एकत्रित कापणी यंत्र वाहनांसाठी मूळ किमतीच्या १५ टक्के सवलत दिली जाणार आहे.

**ॲप बेस वाहनांसाठी धोरण लागू**

राज्यात ॲप बेस वाहनांसाठी समुच्चयक धोरण लागू करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. या धोरणांतर्गत प बेस वाहन सेवा सुरू करण्यासाठी संबंधित वाहन मालकास विविध सुरक्षाविषयक बाबींची पूर्तता करावी लागणार असून यामुळे प्रवाशांची सुरक्षितता निश्चित होणार आहे. राईड पूलिंगचा पर्याय निवडणाऱ्या महिला प्रवाशांना सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून केवळ महिला चालक, प्रवाशांसोबताचा प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून दिला जाणार आहे. वाहनांचे रिअल टाईम, जीपीएस ट्रॅकिंग, आपत्कालीन संपर्क क्रमांक, चालकांची चारित्र्य पडताळणी करणे आवश्यक असेल. चालकांना मान्यताप्राप्त संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणे तसेच चालक आणि सहप्रवाशी यांच्यासाठी विमा आवश्यक करण्यात आला आहे. प्रवाशांना आणि चालकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे जलद निराकरण सुनिश्चित करण्यासाठी, तक्रारींचे निवारण करण्यासाठीची यंत्रणा असणे आवश्यक करण्यात आले आहे.

**महामंडळाची कर्ज मर्यादा १० वरुन १५ लाख रुपये**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती आणि भटक्या जमाती विकास महामंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची मर्यादा १० लाख रुपयांवरुन १५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

## सुरक्षा कर्मचाऱ्यांना आता खाकी गणवेश

नव्या गणवेशामुळे सुरक्षा रक्षकांची ओळख एकसंध राहील आणि त्यांच्या शिस्तबद्धतेत भर पडेल. तसेच या नव्या गणवेशामुळे राज्यातील सुरक्षा व्यवस्थेला अधिक सुसंगत आणि व्यावसायिक स्वरूप प्राप्त होणार असल्याचा विश्वास आकाश फुंडकर यांनी यावेळी व्यक्त केला.

## अकोलेचा ग्रामसेवक वर्पे सेवेतून बडतर्फ

परिषद सेवा वर्तणूक एक नियम ३ चा भंग केला असल्याचे सिध्द झाले आहे. तसेच याप्रकरणी त्यांना सेवेतून बडतर्फ का करण्यात येऊ नये ? याबाबत नोटीस बजावण्यात आली होती. संबंधित नोटीसला वर्पे यांनी सादर केलेल्या खुलाशात समर्थनीय कारण सादर केलेली नाही. यामुळे त्यांचा खुलासा अमान्य करत त्यांच्यावर बडतर्फीची कारवाई करण्यात आली असल्याची आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी येरेकर यांनी काढले आहेत.

**या योजनांमध्ये केला अपहार**

वर्पे यांनी त्यांच्या कार्यकाळात देवठाण व समशेरपूर ग्रामपंचायतीमध्ये काम करतांना दरपत्रकशिवाय ग्रामनिधीचा खर्च करणे, कोटेशनशिवाय खर्च करणे, पाणी पुरवठा विभागाच्या खर्चात अनियमितता, १४ व्या वित्त आयोगाचा नियमबाह्य खर्च करणे यावर कोट्यावधी रुपयांचा खर्च केलेला आहे. यामुळे ग्रामसेवक वर्पे याच्यावर बडतर्फीची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे ग्रामपंचायतीमध्ये गैरवर्तन व अपहार करणाऱ्यांना चाप बसणार आहे.

## ‘प्रवरे’च्या आजी-माजी संचालकांवर गुन्हा दाखल

न्यायालयाने दि. १८ मार्च २०२५ रोजी राहाता कोर्टाने यापूर्वी दिलेल्या निर्णय कायम ठेवून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

सर्वोच्च न्यायालयाचे देलेल्या आदेशानुसार लोणी पोलीस ठाण्यात अण्णासाहेब मुरलीधर कडू, अण्णासाहेब सारंगधर म्हस्के, विठ्ठल मारुतराव गायकवाड, विजय शाळीग्राम चंतुरे, रामभाऊ शंकरराव भुसाळ, गोपिनाथ गेणुजी ढमक, लक्ष्मण पुंजाजी पुलाटे, भाऊसाहेब बाबुराव घोलप, आप्पासाहेब कारभारी दिघे, कारभारी भाऊसाहेब आहेर, भास्करराव निवृत्ती खर्डे, दत्तात्रय साहेबराव खर्डे, अशोक विठ्ठल निबे, तुकाराम नामदेव बेंद्रे, सखाहरी पुंजाजी देठे, बाळासाहेब भगवत आहेर, सारंगधर नामदेव दुशिंग, राधाकृष्ण एकनाथराव विखे, दीपक गोरक्षनाथ पाटील, संपत भाऊराव चितळकर, पार्वताबाई लक्ष्मण तांबे, पद्मा प्रतापराव कडू, भामाबाई राधाकृष्ण काळे, सदाशिव कारभारी गोल्हार पाटील, प्रभाकर पांडुरंग निघुते, विठ्ठलराव गंगाधर मांढरे, बापूसाहेब बाबासाहेब घोलप, धोंडीबा विठोबा पुलाटे, गंगाभीषण भिकचंद आसावा, विश्वासराय केशवराय कडू, आबासाहेब ऊर्फ शशिकांत लक्ष्मण घोलप, शांतीनाथ एकनाथ आहेर, सखाहरी नाथ मगर, काशिनाथ मुरलीधर विखे, सर्जेराव सोन्याबापू खर्डे, सुभाष बाळकृष्ण खर्डे, केरूनाथ संभाजी चेचरे, काकासाहेब सोपानराब म्हस्के, बन्सी बाळू तांबे, बाबासाहेब किसन लोहाटे, सतीश शिवाजी ससाणे, बाळासाहेब बापूजी पारखे, लक्ष्मीबाई नारायण कहार, मथुराबाई सोपानराव दिघे, केशरबाई ऊर्फ नलिनी मोहनीराज देवकर, रामभाऊ शंकरराव भुसाळ, मुरलीधर म्हाळू पुलाटे, झोनल मॅनेजर जी. प्रकाश, यूनियन बँक ऑफ इंडिया झोनल ऑफिस, रा. युनिव्हर्सिटी रोड, शिवाजीनगर, पुणे, झोनल मॅनेजर बँक ऑफ इंडिया, रा. युनिव्हर्सिटी रोड, शिवाजीनगर, पुणे, कार्यकारी संचालक विखे कारखाना, एस. एन. पाटील, व्ही. एस. गुंजाळ, साखर आयुक्त साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे अशा ५४ आरोपींविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४१५, ४२०, ४६४, ४६५, ४६७ ,४७१, ३४,१२० ब प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.